# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,वाडा तालुका जि.ठाणे

वाडा भिवंडी रोड,कल्याण जनता सहकारी बँकेच्या समोर,खंडेश्वरीनाका,वाडा

जा.क्र.सनिवा / सोनाळे सेवा / का.क 77 अ / 12 / सन 2018.
दिनांक 18/ 04 / 2018.

वाचले – 1 महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 अ
2 सोनाळे सेवा सहकारी संस्था, मर्या.सोनाळे ता.वाडा जि.पालघर यांनी दिनांक 17 / 04 / 2018
रोजी या कार्यालयात सादर केलेले पत्र व त्यासोबत सादर केलेली थकबाकीदार सदस्यांची यादी.

ज्याअर्थी सोनाळे सेवा सहकारी संस्था,मर्या. सोनाळे ता.वाडा जि.पालघर या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अन्वये झालेली असून सदरची संस्था या कार्यालयाच्या अधिपत्त्या खाली कार्यरत आहे आणि,

ज्याअर्थी, सोनाळे सेवा सहकारी संस्था,मर्या. सोनाळे ता.वाडा जि.पालघर या संस्थेच्या 12 पैकी संस्थेचे 7 सदस्य थकबाकीदार असल्यामुळे संस्थेचा कोरम पूर्ण होत नाही. सचिव यांनी वरील संदर्भ क्र. 2 चे दिनांक 17 / 04 / 2018 रोजीचे पत्रान्वये सदरची बाब थकबाकीदार सदस्यांची यादीसह या कार्यालयाचे निदर्शनास आणून दिलेली आहे आणि,

ज्याअर्थी त्यामुळे सोनाळे सेवा सहकारी संस्था,मर्या. सोनाळे ता.वाडा जि.पालघर या संस्थेच्या 12 पैकी 7 सदस्य थकबाकीदार असल्यामुळे संस्थेचा कोरम पूर्ण होत नसल्यामुळे संस्थेच्या कामकाजात पोकळी निर्माण झाली आहे आणि,

ज्याअर्थी चालू खरीप हंगामामध्ये कर्ज वाटपाचे दिलेले लक्षांक पूर्ण करणेसाठी व सभासदाचे मंजूर कर्ज वितरित करणेसाठी तसेच संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी उक्त संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नेमून संस्थेचे कामकाज सुरु ठेवणे आवश्यक असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## –: आदेश :–

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 अ नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी वी.वी.पाटील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,वाडा सोनाळे सेवा सहकारी संस्था, मर्या. सोनाळे ता.वाडा जि. पालघर या संस्थेवर श्री.एस.जी.रडे बँक तपासणीस वाडा शाखा यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

सदरचा आदेश माझे सही व शासन मुद्रेसह दिला असे.

दिनांक – 18 / 04 / 2018
स्थळ – वाडा

(वी.वि.पाटील)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था,वाडा.

प्रत –

1) श्री.एस.जी.रडे. बँक तपासणीस, वाडा शाखा

2/– यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्वरीत संस्थेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून कामकाज सुरु करावयाचे असून किमान सहा महिन्याचे आंत नवीन समिती गठीत करणेसाठी नमुन्यात मतदार यादी व ई–1,ई–2 मधील माहिती या कार्यालयास सादर करावी.

2) श्री.सुजित वासुदेव पाटील, सचिव सोनाळे सेवा सहकारी संस्था, मर्या. सोनाळे, ता.वाडा जि.पालघर
यांनी प्राधिकृत अधिकाऱ्यास संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे पार पाडणेसाठी सर्वोतोपरी सहाय्य करावे.

3) शाखाधिकारी दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.ठाणे, शाखा– वाडा.

प्रत माहितीसाठी सविनय सादर.
1) मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पालघर

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, वाडा.